# प्रेसनोट

जा.क्र.पोउपआ/वाहतूक/पुणे शहर/ /२०१८ पुणे, दिनांक- १२/०८/२०१८

**विषय :- पुणे शहरातील १०० चौक " No Traffic Rule Violation Zone " तयार करुन तेथे वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार असले बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखा,पुणे महानगरपालिका,प्रादेशिक परिवहन विभाग,पीएमपीएमएल विभाग यांचेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत असून,वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. वाहनचालकांना शिस्त लागून अपघाताचे प्रमाण कमी व्हावे याकरीता वाहतूक शाखेतर्फे वेळोवेळी विशेष मोहिम राबवून वाहतूक नियमभंग करणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते.

पुणे शहर वाहतूक शाखा,पुणे पोलीस व प्रशासन,प्रादेशिक परिवहन विभाग,पुणे महानगरपालिका,एमएसईबी यांनी, पुणे शहरातील गर्दीचे १०० चौक निश्चित केले असून ते चौक/ रोड हे नो-व्हायोलेशन झोन तयार केले आहेत सदर ठिकाणी दिनांक- १९/१०/२०१८ रोजी पासून पुणे शहर वाहतुक शाखा,पुणे महानगरपालिका,प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,पुणे यांचे समन्वयाने संयुक्तपणे वाहतुकीचे नियमभंग करणारे वाहनचालकांवर कारवाई करणार आहेत. नो-पार्कींग तसेच फुटपाथवर उभी केलेली वाहने उचलण्यासाठी महानगरपालिका यांचेकडून टेम्पो व क्रेन उपलब्ध होणार आहेत. वाहने व पादचा-यांची सर्वाधिक गर्दी असलेल्या ठिकाणीवरील अतिक्रमणे काढण्यात येणार आहेत त्यामुळे चौक अतिक्रमणमुक्त झाल्यामुळे वाहतुक काही प्रमाणात सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच सदर झोनमध्ये वाहतुकीस अडथळा होणारे रोडवरील खड्डे बुजविणे, झेब्रा स्टॉपलाईन पट्टे रंगविणे,विद्युत पोल स्थलांतरीत करणे, सिग्नलला अडथळा होणा-या झाडांच्या फांद्या छाटणे वगैरे बाबीची पुर्तता करण्यात येत आहे.

तरी वाहन चालकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे.


महाराष्ट्र पोलीस